महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

गुरुवार, दिनांक ०८ मार्च, २०१८ / फाल्गुन १७, १९३९ (शके)

(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री
(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री
(३) कृषी, फलोत्पादन मंत्री
(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री
(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ५६

बोर्ला (ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर) येथील जमिनीची अवैधरित्या खरेदी-विक्री केल्याबाबत

(१) * ३८०५१ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोर्ला (ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर) येथील न.भू.क्र. ६६७, सर्व्हे नं. ८०/९३ हा भूखंड के.ए. सल्लाउद्दिन व इतर ५ वारसांच्या नावे वडिलोपार्जित असूनही सन २०१७ मध्ये उक्त भूखंड शिवशक्ती डेव्हलपर्स यांचे नावे दाखल करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी के.एन.इकबाल यांनी तत्कालीन महसूल मंत्री महोदयांकडे अपिल केले असता त्यांनी क्र.मंत्री/म व पु.भू.पु.,कृ.व फलो.,पदुम, रा.ऊ.शु.,अ.वि.,व/अपिल/४९२/२०१५, दिनांक २४ सप्टेंबर, २०१५ रोजी प्रथम सुनावणी पावेतो स्थगिती आदेश दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिवशक्ती डेव्हलपर्स यांनी शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संगनमत करून बनावट कागदपत्रांच्या आधारे सदर मिळकतीवर आपले नाव नोंदविलेले आहे, शिवशक्ती डेव्हलपर्स यांनी आपले नाव सदर मिळकतीवर नोंदविल्यानंतर सदर भूखंड शिवशबरी डेव्हलपर्सला विकल्याने त्यांचे नांव या मिळकतीवर लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारे उक्त डेव्हलपर्स यांनी आजुबाजूच्या सर्वच जागा हडप केल्या आहेत व त्यावर बांधकाम सुरु केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बनावट कादपत्रांच्या आधारे मिळविलेल्या जमिनीरील शिवशबरी डेव्हलपर्सचे लागलेले नावाची नोंद कमी करुन के.ए.सल्लाउद्दिन व इतर ५ वारसांच्या नावे नोंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२), (३), (४) व (५) मौजे बोर्ला, ता.कुर्ला, जि.मुंबई उपनगर येथील न.भू.क्र. ६६७, सर्व्हे नं. ८०/९३ या भूखंडावर २०१७ साली शिवशक्ती डेव्हलपर्स यांचे नांव दाखल करण्यात आलेले नाही.

या मिळकतीवर धारक म्हणून नटराज रियलकॉन प्रा.लि. तर्फे संचालक अवतारसिंग अलग यांचे नांव आणि इतर हक्क सदरी के.ए. सल्लाऊद्दीन व इतर ५ वारसांची नांवे दाखल होती. उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश यांचे अपील आदेश दिनांक ३१/०३/२०१५ अन्वये इतर हक्कातील उक्त नमूद नावांच्या नोंदी दिनांक १८/०४/२०१५ रोजी कमी करण्यात आल्या. तद्नंतर, तत्कालीन मंत्री (महसूल) यांच्या दिनांक २४/०९/२०१५ च्या आदेशान्वये उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश यांच्या उक्त नमूद आदेशास प्रथम सुनावणी पर्यंत स्थगिती दिली असून स्थगिती आदेशाची नोंद मिळकत पत्रिकेवर घेण्यात आलेली आहे.

नटराज रियलकॉन प्रा.लि. यांनी या मिळकतीच्या क्षेत्रापैकी २७३४.७५ चौ.मी. क्षेत्र शिवशबरी डेव्हलपर्स यांना नोंदणीकृत खरेदी खताने खरेदी दिल्याने या क्षेत्रापुरते शिवशबरी डेव्हलपर्स यांचे नांव अधिकार अभिलेखात दाखल केले आहे.

नगर भूमापन अधिकारी, चेंबूर यांनी सदर जागेची स्थळ पाहणी केली असता न.भू.क्र. ६६७अ/२ या मिळकतीवर शिवशबरी डेव्हलपर्स यांचे बांधकाम चालू असून, त्या व्यतिरिक्त त्याच्या आजुबाजूला कोणतेही बांधकाम चालू असल्याचे आढळून आले नाही.

इतर हक्क सदरी दाखल असलेले के.ए. सल्लाऊद्दीन व इतर ५ वारसांची नावे ही उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश यांच्या दिनांक ३१/०३/२०१५ च्या आदेशान्वये कमी करण्यात आली आहेत. सदर आदेशाविरूध्द के.ए. सल्लाऊद्दीन व इतर ५ यांनी मंत्री (महसूल) यांच्या न्यायालयात फेरतपासणी अर्ज दाखल केला असून त्याबाबत वेळोवेळी सुनावण्या झालेल्या आहेत. या प्रकरणी अद्याप अंतिम आदेश पारीत झालेले नाहीत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाडा विभागाचे विभाजन करुन आयुक्त कार्यालय व जिल्हा निर्मिती करण्याबाबत

(२) * ३८०२१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५०७७ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागाचे विभाजन करून नवीन तीन आयुक्तालय व नवीन जिल्हा निर्मितीबाबतचा अहवाल तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या एक सदस्य समितीने दिनांक ३० डिसेंबर, २०१६ रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परभणी येथे आयुक्तालय स्थापन करण्याची मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मराठवाडा विभागाचे विभाजन करून नवीन आयुक्तालय करण्याबाबत तसेच, बीड जिल्ह्याचे विभाजन करून नागरिकांच्या मागणीनुसार नवीन अंबाजोगाई जिल्हा निर्मिती करण्यासह राज्यातील नवीन जिल्हा निर्मितीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) होय.

(२) होय.

(३) तत्कालीन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या एक सदस्यीय अभ्यास गटाने फेर अभ्यास करुन सादर केलेला सुधारीत अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याच्यादृष्टीने कार्यवाही सुरु आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या निकषानुसार जिल्ह्याचे विभाजन/पुनर्रचनेबाबत प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पशुसंवर्धन विभागांतर्गत लस खरेदी प्रकरणी नियमबाह्य निविदा प्रक्रिया राबवून गैरव्यवहार केल्याबाबत

(३) * ३७६५३ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे,

डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पशुसंवर्धन विभागांतर्गत एफ.एम.डी. लस खरेदी प्रकरणी नियमबाह्य निविदा प्रक्रिया राबवून ठराविक निविदाकारास फायदा मिळवून देऊन राज्यातील पशुधनाचे आरोग्य वेठीस धरुन कोट्यवधीचा गैरव्यवहार करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विभागाचे प्रधान सचिव, सचिव, उद्योग संचालक, आयुक्त या सर्वांचे अभिप्राय डावलून मे.बॉयोवेट प्रा.लि. या कंपनीची निविदा मंजूर करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकारामुळे राज्यातील दोन कोटींपेक्षा अधिक पशुधनांना गेल्या वर्षभरात लस न मिळाल्यामुळे राज्यात लाळखुरकत या रोगाचा प्रादुर्भाव होवून शेतकऱ्यांचे हजारो कोटींचे नुकसान झाले असून केंद्र शासनाने लसीकरणासाठीचा निधी प्रलंबित ठेवल्याने गोवंशातील प्राण्यांसोबतच शेळ्या-मेंढ्या आणि अन्य प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी जबाबदार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच, पशुधनांना लस उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.महादेव जानकर : (१) व (२) हे खरे नाही.

शासनाच्या धोरणानुसार रुपये ३.०० लक्षपेक्षा जास्त निधीची खरेदी असल्यास ई-निविदेद्वारे उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०१६ अन्वये तसेच, वेळोवेळी शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे लाळखुरकुत रोग प्रतिबंधक लस खरेदी प्रक्रिया दिनांक ०४/०५/२०१७ पासून राबविण्यात येत आहे. निविदा प्रक्रियेत तांत्रिक अडचणी उद्भवल्यामुळे प्रक्रियेस विलंब झालेला आहे.

लाळखुरकुत रोग प्रतिबंधक लस खरेदी ई-निविदा प्रक्रिया पार पडलेली असून मे.बायोव्हेट प्रा.लि. या लस उत्पादक कंपनीस लस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले होते व सदर कंपनीने लसीचा पुरवठा सुरु केलेला असून लसीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) लसीकरणास झालेल्या विलंबामुळे राज्यातील पशुधनास लाळखुरकुत रोग प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात सदर योजनेंतर्गत पहिल्या व दुसऱ्या हप्त्यांतर्गत केंद्र शासनाचा ६० टक्के हिश्श्याचा एकूण निधी रुपये २४.२८ कोटी राज्यास प्राप्त झालेला आहे. केंद्र शासनाने या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी निधी रखडविलेला नाही.

(४) निविदा प्रक्रियेत कोणताही गैरव्यवहार झालेला नसल्याने दोषींवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. लाळखुरकुत रोग प्रतिबंधक लस खरेदी ई-निविदा प्रक्रिया पार पडलेली असून मे.बायोव्हेट प्रा.लि. या लस उत्पादक कंपनीस लस पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत व सदर कंपनीने लसींचा पुरवठा सुरु केलेला असून लसीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी तसेच बाळापूर मंडळ अधिकारी यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

(४) * ३९०४७ श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमनुरी (जि.हिंगोली) तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी तसेच बाळापूर मंडळ अधिकारी यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण शिबिर, सहल व वैयक्तिक लाभासाठी आलेले अनुदान कागदोपत्री तयार करुन लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी जिल्हाधिकारी, हिंगोली तसेच जिल्हा कृषी अधिकारी, हिंगोली यांच्याकडे दिनांक २८ जुलै, २०१७ रोजी लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१) व (२) याबाबत तालुका अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांनी दिनांक २८/०७/२०१७ अन्वये उपविभागीय अधिकारी (महसूल), कळमनुरी, जि.हिंगोली यांच्याकडे तक्रार केली होती. उपविभागीय अधिकारी, कळमनुरी यांनी सदर तक्रार दिनांक ३१/१०/२०१७ अन्वये योग्य त्या कार्यवाहीसाठी उपविभागीय कृषी अधिकारी, हिंगोली यांना पाठविली आहे.
(३) उक्त तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी, हिंगोली यांच्याकडून चौकशीची कार्यवाही करण्यात येत असून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील विकास कामासाठी जमिनींचे हस्तांतरण मुंबई महानगरपालिकेला करण्याबाबत

(५) * ३७९२९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील विकास कामांसाठी आवश्यक जमिनींचे हस्तांतरण शासनाने करावे यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनाकडे रूपये ३५२ कोटी २३ लाखांचा निधी जमा केलेला असून जिल्हाधिकाऱ्यांकडे १६७ प्रस्ताव दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, सदरहू प्रस्तावावर कार्यवाही होणेसाठी किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू प्रस्तावावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) अंशत: खरे आहे.

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाशी ४४ प्रस्ताव तर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयाशी १२३ असे एकूण १६७ प्रस्ताव संबंधित आहेत.

सदर प्रस्तावांचे स्वरुप हे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात मनोरंजन मैदान, खेळाचे मैदान, स्मशानभूमी, रस्ते, प्राथमिक शाळा, पार्किंग लॉट इ. सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या जमिनीचे बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी भूसंपादन करणे हे आहे.

अ) <u>जिल्हाधिकारी, मुंबई शहर</u> यांचेकडील एकूण ४४ प्रस्तावांपैकी १४ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित ३० प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अप्राप्त - ९
२) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले - १६
३) कार्यवाही संपलेले प्रकरणे - ३
४) निवाडा घोषित परंतु म.न.पा. ताबा न घेतलेले - २

ब) <u>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर</u> यांचेकडील एकूण १२३ प्रस्तावांपैकी ५५ प्रस्तावांवर कार्यवाही सुरु आहे.

उर्वरित ६८ प्रस्तावांची विगतवारी खालीलप्रमाणे :-

१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे परत पाठविण्यात आलेले प्रस्ताव - ५५
२) आरक्षण रद्द परंतु प्रस्ताव अप्राप्त - १
३) निवाडा घोषित करुन ताबा देणेसाठी - ६
४) कार्यालयास अपाप्त - ३
५) कार्यवाही पूर्ण तथापि न्यायालयात प्रलंबित - २
६) यादित दुबार असलेली प्रकरणे - १

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रस्तावांसाठी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे सुमारे रुपये ५८.७३ कोटी इतका निधी जमा आहे तसेच जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे सुमारे रुपये २९४.७० कोटी इतका निधी जमा आहे. (प्रलंबित प्रकरणांसाठी सुमारे रुपये २४७.४५ कोटी व महानगरपालिकेकडे परत केलेल्या प्रकरणांसाठी सुमारे ४७.२५ कोटी) असा एकूण सुमारे रुपये ३५३.४३ कोटी निधी रक्कम जमा आहे.

(३) मुंबईतील महत्वाच्या विकास कामांना चालना देण्यासाठी रखडलेली भूसंपादनाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी शासनस्तरावरुन संबंधित जिल्हाधिकारी यांना शासन पत्र दिनांक ०८/०८/२०१७ व दिनांक ०१/११/२०१७ अन्वये आवश्यक सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०९/१०/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत विषयांकीत प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही तातडीने करणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सद्य:स्थितीत, जिल्हाधिकारी, मुंबई शहर आणि जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालयाकडून प्रलंबित प्रकरणांमध्ये संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून भूसंपादनाची प्रक्रिया जलद गतीने करणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात बोंडअळी प्रादुर्भावामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

(६) * ३८२१२ ॲड.जयदेव गायकवाड : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) तालुक्यात कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी बोंडअळी प्रादुर्भावामुळे नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या बाधित झालेल्या क्षेत्राचे चुकीचे पंचनामे केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार चुकीच्या पध्दतीने पंचनामे करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत तसेच, चुकीच्या पध्दतीने केलेले पंचनामे रद्द करुन पुन्हा योग्यरित्या पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसानीची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१) हे खरे नाही.
(२) बोंडअळीमुळे बाधित झालेल्या क्षेत्राचे पंचनामे संयुक्तरीत्या महसूल यंत्रणेच्या अधिपत्त्याखाली तलाठी, ग्रामसेवक व कृषी विभागाचे कृषी सहाय्यक यांच्या संयुक्त पथकामार्फत करण्यात आलेले आहेत. सदर पंचनामे शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार केलेले आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या नुकसानीचे चुकीच्या पध्दतीने पंचनामे केल्याची बाब आढळून आलेली नाही. याबाबत वैजापूर तालुक्यातील कोणत्याही गावातून कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी चुकीचे पंचनामे केल्याबाबतची लेखी तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे बोढरे व शिवापूर (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथील जमीन बेकायदेशीर खरेदी केल्याबाबत

(७) * ३८०२० श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने बंजारा व दलित समाजाला नवीन अविभाज्य शर्तीवर मौजे बोढरे व शिवापूर (ता.चाळीसगाव, जि.जळगाव) येथे वितरीत केलेल्या जमिनी १) मे.गो रिन्युवेबल एनर्जी प्रा.लि., ठाणे, २) जे.बी.एम. सोलर पॉवर लि., दिल्ली, ३) फर्मी सोलर फार्म्स प्रा.लि., नवी दिल्ली या कंपन्यांनी शासकीय नियम व अटी शर्तीचा भंग करून ९०० ते १००० एकर जमिनीची खरेदी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ च्या नवीन भूसंपादन कायद्यानुसार खाजगी कंपन्यांना ग्रामीण भागात १०० एकर पेक्षा अधिक जमीन खरेदी करावयाची असल्यास कलम ४६ अन्वये खाजगी वाटाघाटी व जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने व परवानगीनेच खरेदी करणे क्रमप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मौजे बोढरे व शिवापूर या गावांतील शेतजमीन पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन मंत्रालय केंद्र शासन यांचेकडील दिनांक ९ डिसेंबर, २०१६ चे अधिसूचनेनुसार इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये समाविष्ट केलेली असून सदरहू जमीन गौताळा अभयारण्याच्या उत्तरेकडील बाजूस असलेल्या हद्दीपासून १ किलोमीटर परिक्षेत्रात इको सेन्सेटिव्ह झोन घोषित केला असून व सदरहू कंपन्यांनी खरेदी केलेली ही जमीन त्याठिकाणी चालू असलेले सोलर प्लांटचे काम हे इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक शेतकऱ्यांनी उपरोक्त प्रकरणाचे निवेदन मा.महसूल मंत्री, मा.ऊर्जा मंत्री, मा.महसूल राज्यमंत्री व सचिव, वन विभाग यांना दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी देऊन या प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२) व (३) महाराष्ट्र शासनाने बंजारा व दलित समाजाला नविन अविभाज्य शर्तीवर वर्ग-२ धारणाधिकाराने मौजे बोढरे व शिवापूर ता.चाळीसगांव, जि.जळगांव येथे शेत जमिनी वितरीत केलेल्या आहेत.

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ६३-एक-अ अन्वये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनार्थ मे.गो रिन्युवेबल एनर्जी प्रा.लि. ठाणे; जे.बी.एम. सोलर पॉवर लि., दिल्ली व फर्मी सोलर फार्म्स प्रा.लि. नवी दिल्ली यांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले एकूण क्षेत्र व त्यापैकी वर्ग-२ धारणाधिकाराचे क्षेत्र याबाबतचा तपशिल पुढील तक्त्यात नमूद केला आहे.

कंपनीचे नाव	शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले एकूण क्षेत्र (हे.आर.)	त्यापैकी वर्ग-२ धारणाधिकाराचे क्षेत्र (हे.आर.)
मे.गो रिन्युवेबल एनर्जी प्रा.लि. ठाणे	१७६.११	१५२.०९
जे.बी.एम. सोलर पॉवर लि., दिल्ली	१७१.५७	१५१.९१
फर्मी सोलर फार्म्स प्रा.लि., नवी दिल्ली	८.५७	७.५७

महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ६३-एक-अ मधील तरतूदीनुसार उक्त नमूद जमिनी संबंधित कंपनीनी खरेदी केलेल्या आहेत. या जमिनी नवीन भूसंपादन कायद्याच्या तरतुदीन्वये खरेदी केलेल्या नसल्याने या प्रकरणी सदर कायद्याच्या अन्य तरतुदी लागू होत नाहीत.

इको सेन्सिटिव्ह झोनमध्ये समाविष्ट जमिनीवर सोलर प्रकल्प राबविण्याबाबत उपवन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांच्या कार्यालयाने फर्मी सोलर फार्म्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना "ना-हरकत प्रमाणपत्र" दिलेले आहे. तसेच जे.बी.एम. सोलर पॉवर लि., दिल्ली यांनी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने सदर कंपनीने खरेदी केलेल्या मौजे बोढरे येथील जमिनीचे गट नं. ५०, ५२, ५५, ५६, ५७, ५८, ५९, ६०, ६२, ६३, ६४, ६५, ६६, ६८, ६९, ७३, ७४, ७५, ७६, ७७, ७८, ७९, ८६ या जमिनी इको सेन्सिटिव्ह झोन मध्ये समाविष्ट नसल्याचे उपवन संरक्षक (प्रादेशिक), औरंगाबाद यांच्या कार्यालयाने कळविले आहे.

(४) व (५) स्थानिक शेतकऱ्यांनी दिनांक २७/११/२०१७ रोजीचे शासनास सादर केलेल्या निवेदनाबाबत जिल्हाधिकारी, जळगाव यांचा अहवाल मागविण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत

(८) * ३८३३९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.रामराव वडकुते, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रकाश गजभिये : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी जमीन संपादन करण्याचे काम संथगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती जमीन मालकांनी आपली जमीन शासनास दिली आहे, त्यांना बाजारभावाप्रमाणे किती मोबदला देण्यात आला आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मुंबई-गोवा महामार्गाचे पूर्ण क्षमतेने जलद गतीने चौपदरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

(२) उक्त महामार्गासाठी अद्यापपर्यंत सुमारे ५६,१६३ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करण्यात आल्या असून त्यांना राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील तरतुदीस अनुसरून मोबदला देण्यात आला / येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालवण, देवगड व वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) या तालुक्यातील मच्छिमारांच्या मागण्यांबाबत

(९) * ३७९२८ ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.बाळाराम पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण, देवगड व वेंगुर्ले (जि.सिंधुदुर्ग) या तालुक्यांसाठी असलेले मत्स्य व्यवसाय विभागाचे कार्यालय मच्छिमारांना विश्वासात न घेता व मासेमारीचा व्यवसाय नसलेल्या कुंभारपाठ या गावात स्थलांतरीत करण्याचा शासनाचा विचार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालय स्थलांतरीत करु नये या मागणीचे व स्थलांतरीत झाल्यास उग्र आंदोलन करण्याचे निवेदन जिल्हा मच्छिमार सहकारी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात मत्स्य कार्यालयावर मोर्चा काढून संबंधित अधिकाऱ्यांना दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.महादेव जानकर : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, सिंधुदुर्ग-मालवण कार्यालयाच्या जवळ आवश्यक क्षेत्रफळाची जागा उपलब्धततेबाबत आयुक्त कार्यालयस्तरावरुन चौकशी करण्यात आली असून, याबाबत निर्णय घेण्याची प्रक्रीया आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्यास्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

"मनोरा" आमदार निवासातील कामांचे बोगस देयके तयार करुन गैरव्यवहार केल्याबाबत

(१०) * ३८०७५ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक ३५९४२ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील मनोरा आमदार निवासातील खोल्यांची कामे केल्याचे दाखवून बोगस देयके तयार करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे प्राथमिक तपासणीमध्ये निदर्शनास आले, याप्रकरणी जबाबदार संबंधित उपअभियंता व शाखा अभियंता यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात येवून संबंधित कार्यकारी अभियंता यांची अकार्यकारी पदावर बदली करण्यात आली असून सदर गैरव्यवहार प्रकरणी सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई या राज्यस्तरीय दक्षता पथकास चौकशीचे आदेश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यानुसार सुरू असलेली चौकशीची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) होय.

(२) होय.

(३) व (४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई यांच्याकडून दिनांक २१/०२/२०१८ च्या पत्रान्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची छाननी करण्यात येत आहे.

वांद्रे (पुर्व), मुंबई येथील शासकीय वसाहतीतील सदनिकाधारकांचे पुनर्वसन करण्याबाबत

(११) * ३८००६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पुर्व), मुंबई येथील शासकीय कर्मचारी वसाहतीतील सदनिकाधारकांना घरे रिक्त करण्याच्या नोटीसा सार्वजनिक बांधकाम विभागाने दिल्या असून सदर सदनिकाधारकांची घाटकोपर येथील कर्मचारी वसाहतीत निवासी व्यवस्था करण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घाटाकोपर येथील शासकीय वसाहतीत पायाभूत सुविधा नसल्यामुळे सदनिकाधारकांची वांद्रे (पुर्व), मुंबई या ठिकाणी पुनर्वसन करणेबाबत मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

वांद्रे (पूर्व) येथील सदनिकाधारकांना घरे रिक्त करण्याच्या नोटीसा देण्यात आल्या असून सदर सदनिकाधारकांची घाटकोपर तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून युएलसी अंतर्गत उपलब्ध होत असलेल्या सदनिकांमध्ये पायाभुत सुविधा व दळणवळणाची साधने याचा विचार करुन स्थलांतर करणेबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.

याव्यतिरीक्त मुंबईमध्ये अन्य ठिकाणी उपलब्ध होऊ शकणाऱ्या शासकीय सदनिकांच्या शक्यतेबाबतची माहिती प्रधान सचिव, नगरविकास विभाग, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ यांचेकडून मागविण्यात आली आहे.

(२) वांद्रे येथील शासकीय कर्मचारी वसाहतीमधील कर्मचाऱ्यांची वांद्रे (पुर्व) या ठिकाणी पुनर्वसन करण्याची मागणी आहे हे खरे आहे. तथापि, घाटकोपर येथे सद्य:स्थितीत ३ इमारतींमध्ये १६२ पैकी १६० सदनिकांमध्ये शासकीय कर्मचाऱ्यांचे /अधिकाऱ्यांचे वास्तव्य आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

आंबेगाव (बुद्रूक) (जि.पुणे) तालुक्यातील गावांना गावठाणाचा दर्जा देण्याबाबत

(१२) * ३९०२१ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील आंबेगाव (बुद्रूक) परिसरातील जांभुळवाडी व कोळेवाडी या गावांना शासनाने महसूली गावांचा दर्जा दिला आहे, मात्र गावठाणाचा दर्जा दिला नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे येथील स्थानिकांना आपल्याच गावात घर बांधणे बेकायदा ठरत असून वाढत्या कुटुंबासाठी निवाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, तसेच या गावांना गावठाणांचा दर्जा मिळावा व चारही बाजूने एक हजार मीटरपर्यंत जमीन रहिवाशी झोन करावी, अशी येथील ग्रामस्थांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) होय.
(२) ग्रामस्थांची गावठाण घोषित करण्याची मागणी आहे हे खरे आहे.
(३) मौजे जांभुळवाडी-कोळेवाडी या गावासाठी गावठाण निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव तहसिलदार, हवेली यांचेकडे चौकशीकामी पाठविण्यात आलेला असून तहसिलदार, हवेली यांचेकडून परिपुर्ण प्रस्ताव प्राप्त करुन घेऊन तसेच प्रकरणी गावठाण घोषित करण्यासाठी सदर क्षेत्राची मोजणी उपअधिक्षक भूमि अभिलेख हवेली यांच्याकडून करुन घेऊन जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अजनूज (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील भीमा नदीपात्रातून अवैध वाळू उपसा रोखण्याबाबत

(१३) * ३८४२७ श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अजनूज (ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर) येथील भीमा नदीपात्रात सक्शन पंप लावून तसेच यंत्राद्वारे वाळू उपसा न करण्याचा नियम असतांनाही न्यायालयाचा आदेशाचे उल्लघंन करून अवैधरित्या वाळू उपसा सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित महसूल विभाग ठेकेदाराकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२) व (३) मौजे अजनूज, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर येथील वाळूस्थळाचा सन २०१७-१८ या वर्षासाठी लिलाव करण्यात आला असून सदर लिलाव रुपये १,९०,५०,७६०/- एवढ्या रकमेस देण्यात आला असून लिलाव धारकास दिनांक १३/१२/२०१७ रोजी वाळूस्थळाचा ताबा देण्यात आला आहे.

मौजे अजनूज येथील नदी पात्रातून वाळूचे सक्शनपंपाने अवैधरीत्या उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक २३/०१/२०१८ व दिनांक ०८/०२/२०१८ रोजी गुन्हे दाखल केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त महिला शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

(१४) * ३८३०२ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यात सन २००१-२०१६ या १६ वर्षाच्या काळात ३८७५ शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्यापैकी ३५० महिला शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आत्महत्याग्रस्त महिला शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) अंशत: खरे आहे.

यवतमाळ जिल्ह्यात सन २००१-२०१६ या १६ वर्षाच्या काळात एकूण ३७१३ शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आलेली असून सदर प्रकरणात ३९१ एवढ्या महिलांचा समावेश आहे. त्यापैकी १०१ महिला आत्महत्यांची प्रकरणे शासन निकषानुसार पात्र ठरली आहेत.

(२) जिल्हास्तरीय समितीत पात्र ठरलेल्या १०१ प्रकरणी त्यांच्या कुटुंबियांना रुपये १ लक्ष प्रमाणे मदत देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात बळीराजा चेतना अभियानाच्या निधीचा अपहार झाल्याबाबत

(१५) * ३८३५० श्री.हरिसिंग राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ३४८७३ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात पाच ठिकाणी कृषी विभागाकडून शेतकरी मार्गदर्शन शिबिराकरिता रूपये एक लाख पंचवीस हजारचा बळीराजा चेतना अभियानाचा निधी प्राप्त झाला असता कृषी विभागाने कुठलेही मार्गदर्शन शिबीर न घेता सदरहू निधीचा अपहार केल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळ कृषी अधिकारी यांनी ४ महिने सदरहू निधी स्वत: जवळ बाळगल्याने वित्तीय अनियमितता झाल्यामुळे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी संबंधितांवर नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) नाही, हे खरे नाही.
(२) व (३) एप्रिल ते जून, २०१६ यादरम्यान खरीप हंगामाची तयारी, जलयुक्त शिवार व इतर योजनांच्या कामामुळे ऑगस्ट, २०१६ मध्ये ५ प्रशिक्षण शिबीरे घेण्यात आली. चार महिन्यानंतर प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविल्यामुळे संबंधित मंडळ कृषी अधिकाऱ्यास ताकीद देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ओढा (ता.जि.नाशिक) रेल्वे स्टेशन येथे गुड्स टर्मिनल निर्माण करण्याबाबत

(१६) * ३७९५८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओढा (ता.जि.नाशिक) रेल्वे स्टेशन येथे गुड्स टर्मिनल निर्माण करण्याचे काम शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २००९ अन्वये नाशिक विभाग विकास कार्यक्रमामध्ये मंजूर असूनही सदरहू काम माहे जानेवारी, २०१८ पर्यंत सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ओढा रेल्वे स्टेशन येथे गुड्स टर्मिनल निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिवाकर रावते : (१) ओढा ता.जि.नाशिक रेल्वे स्टेशन येथे गुड्स टर्मिनल निर्माण करणेबाबत कोणताही प्रस्ताव मध्य रेल्वेस प्राप्त झालेला नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात रस्ता दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(१७) * ३८५६६ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात इंटरनेटसाठी केबल टाण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असलेले रस्ते खोदले, त्या रस्त्यांच्या डागडुजीसाठी कंपनीने सार्वजनिक बांधकाम विभागाला दोन टप्प्यांत सुमारे सहा कोटी रूपये दिले असून सार्वजनिक बांधकाम विभागाने इंटरनेट केबलिंगसाठी खोदलेल्या रस्त्याचे कामे कागदावरच दाखविण्यात येवून रुपये सहा कोटींचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यां संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) होय, हे खरे आहे.

(२) शासनाने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठीत केली असून, सदर समितीकडून तपासणीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मंडणगड, बाणकोट व केळशी मार्गावरील अवजड वाहनांची वाहतुक रोखण्याबाबत

(१८) * ३८३०४ श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंडणगड-बाणकोट व मंडणगड-केळशी या रस्त्यांची नव्याने दुरुस्ती करण्यात आली असता सदर रस्त्यावर बॉक्साईटने भरलेले अवजड वाहनांची वाहतूक सुरु असल्याने सदर रस्त्याची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावरील बॉक्साईटने भरलेल्या अवजड वाहनांची वाहतूक बंद करावी याबाबत तहसिलदार यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी वेळोवेळी पत्र व्यवहार केला असता त्याकडे शासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्यावरील अवजड वाहतुक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ते बाणकोट-मंडणगड-पंढरपूर रस्ता प्र.रा.मा.१५ व केळशी-मांदिवली-देव्हारे रस्ता प्रजिमा ३ चे भाग आहेत. या रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे भरुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

या रस्त्यावर अवजड वाहनांची वाहतुक होत असल्याची तक्रार असल्याने तहसिलदार, मंडणगड यांनी बैठक आयोजित केली होती. या बैठकीस खाण कंपनीचे प्रतिनिधी हजर होते. बैठकीत सदर वाहतुक तात्पुरत्या स्वरुपाची असून ती १०-१२ दिवसात बंद करण्यात येणार आहे असे स्पष्ट झाले आहे.

सिरोंचा (जि.गडचिरोली) तालुक्यातील प्राणहिता नदीवरील पुलाचे काम करण्याबाबत

(१९) * ३८९२४ श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिरोंचा (जि.गडचिरोली) तालुक्यातील प्राणहिता नदीवरील पुलाच्या कामाकरीता रुपये १०६ कोटींची मंजूरी मिळूनही पुलाचे बांधकाम बंद स्थितीत असल्याचे दिनांक १० डिसेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर पुलाचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) डिसेंबर, २०१७ मध्ये नदीला जास्त पाणी असल्याने प्रस्तावित पुलाचे प्रत्यक्ष बांधकाम बंद होते, हे खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यातील प्राणहिता या बारमाही नदीवर ३.८० कि.मी. जोडरस्त्यासह ८५५ मी. लांबीच्या मोठ्या पुलाच्या बांधकामासाठी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून सद्य:स्थितीत सर्व स्तंभाचे बांधकाम पुर्ण झाले असून पोचमार्गाचे मातीकाम बहुतांशी पुर्ण झाले आहे. तसेच पुलाच्या स्लॅबसाठी गर्डर कास्टींगचे काम व स्तंभावरील कॅपचे बांधकाम प्रगतीत आहे. सदरील काम पुर्ण करण्याची मुदत दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ पर्यंत असून विहीत मुदतीत काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर-ब्रिजापूर राष्ट्रीय महामार्गाला केलेला विरोध

(२०) * ३९०२० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर-ब्रिजापूर राष्ट्रीय महामार्गाला स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध असल्यामुळे त्यांच्या शंकाचे निरासन करण्यासाठी चिपळूण येथील प्रांत कार्यालयात आयोजित बैठकीत राष्ट्रीय महामार्ग, कोल्हापूर विभागाच्या अधिकाऱ्यांनी महामार्ग संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांना उलटसुलट उत्तरे दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीत कार्यकारी अभियंता व्ही.आर.कांडगावे यांनी रस्ता झाला तरी बरा, नाही झाला तरी चालेल, असे बेजबाबदार उत्तर दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे लाहे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील अवैध उत्खनन रोखण्याबाबत

(२१) * **३७७७४ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे लाहे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे गट नं. ८६, ११४, ११५, ११६, ११८, ११९, १२०, १६७, १६८, १६९ या जागेत अवैध उत्खनन सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उत्खननाबाबत कोणतीही परवानगी न घेतल्यामुळे शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन अवैध उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२) व (३) मौजे लाहे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील गट नंबर ८६, ११४, ११५, ११६, ११८, ११९, १२०, १६७, १६८, १६९, १७० व १७१ या जागेत अवैध उत्खनन सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित जमीन मालकांविरुध्द रुपये ३,७८,९९,४६४/- इतक्या रक्कमेच्या दंडाचे आदेश दिनांक १९/०१/२०१८ रोजी तहसिलदार यांनी पारित केले असून सदर आदेशानुसार संबंधित जमीन मालकाकडून दंडाची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही तहसिलदार, शहापूर यांचेस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

देगलुर (जि.नांदेड) तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक अनुदान देण्याबाबत

(२२) * ३८५२८ श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१६ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या परंतु विमा न भरलेल्या शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान २ हेक्टरपर्यंत देण्याचा शासनाने निर्णय घेतला असून या निर्णयाला १ वर्षाचा कालावधी उलटूनही देगलुर (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांना अद्याप अनुदान मिळालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) शासन निर्णय, दिनांक ०९ जानेवारी, २०१७ अन्वये राज्यात माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ च्या अतिवृष्टीमुळे व शासन निर्णय दिनांक २३ मे, २०१७ अन्वये राज्यात माहे एप्रिल ते मे, २०१६ व माहे नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत झालेल्या अवेळी पाऊस व गारपीटीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत मदत म्हणून देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांकडून निधी मागणीबाबतचा एकत्रित प्रस्ताव संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर असून, सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीची कार्यवाही करण्याची बाब प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ चे चौपदरीकरण करण्याबाबत

(२३) * ३८७६२ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ३५७२२ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नागपूर शीघ्रसंचार द्रुतगती (समृध्दी) महामार्गामुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ च्या चौपदरीकरणाच्या कामात अडथळे निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू महामार्गाचे काम १५ टक्के पुर्ण झालेले असून सदरहू काम मे, २०१९ पर्यत पुर्ण करण्याचा करार संबंधित ठेकेदारासमवेत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महामार्गाचे उर्वरित काम प्रलंबित राहिल्याने महामार्गावर मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्ता दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) नाही, हे खरे नाही असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(२) होय, हे खरे आहे. अमरावती ते चिखली ह्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण खाजगीकरणामधून प्रगतीत असून मे, २०१९ पर्यंत बांधकाम पुर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(३) राष्ट्रीय महामार्ग ६ चे काम प्रलंबित राहिल्याने अपघात होत आहेत, हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(४) सवलतकारामार्फत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करण्यात येत असून रस्ता सुस्थितीत आहे. त्यामुळे चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, अमरावती यांनी कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यातील गिरणा नदीतील वाळू लिलाव रद्द करण्याबाबत

(२४) * ३९५०७ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा नदीतील वाळू ठिय्यांचे महसूल विभागामार्फत होणारे लिलाव रद्द करण्यात यावेत, अशी मागणी गिरणा नदी काठावरील कळवण, सटाणा आणि मालेगांव (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांनी व नदीकाठच्या गांवातील ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे केल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गिरणा नदीतील अमर्याद वाळू उपसा व अवैध वाळू चोरीमुळे नदी पात्रात मोठमोठे खड्डे निर्माण झाले असून नदीपात्रातील पाण्याची पातळी खोलवर जावून नदीवर अवलंबून असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या योजना संकटात सापडून गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महसूल खात्याकडून गिरणा आणि मोसम नदीतून अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांविरुध्द वेळोवेळी कारवाई केल्यानंतरही गिरणा व मोसम नदीतून वाळू चोरीचे प्रकार सर्रास सुरु असून मालेगांव-चंदनपुरी रस्त्यावर बजरंगवाडी भागात उघड्यावर सर्रास व मोठ्या प्रमाणात गिरणा नदीतील वाळूची विक्री व वाहतुक केली जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाचे महसूलाचे होत असलेले नुकसान, नदीपात्रात पडलेले मोठमोठे खड्डे, पात्राची वाढलेली मोठी खोली व पाणी योजनांवर होणारा विपरीत परिणाम याबाबी विचारात घेता, वाळू तस्करांविरुध्द कठोर कारवाई करणे व गिरणा नदीतील वाळू लिलाव रद्द करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) असे निवेदन जिल्हाधिकारी, नाशिक यांचे कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) मालेगांव-चंदनपूरी रस्त्यावर बजरंगवाडी भागात माहे एप्रिल, २०१७ ते जानेवारी, २०१८ अखेर गौणखनिजाच्या अवैध वाहतुकीच्या १९ प्रकरणी दंडात्मक कार्यवाही करुन रुपये २,१८,४५५/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

गिरणा नदीपात्रातील कळवण तालुक्यातील ४, दिंडोरी तालुक्यातील १ व मालेगांव तालुक्यातील १ असे एकूण ६ वाळूस्थळाचे लिलाव करण्यात आले आहेत व हे लिलाव संबंधित ग्रामसभेने दिलेल्या संमतीनुसार करण्यात आले आहेत.

दिनांक ०१/०४/२०१७ ते दिनांक ३१/०१/२०१८ या कालावधीत नाशिक जिल्ह्यामध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीच्या ९६९ प्रकरणांमध्ये दंडात्मक कारवाई करुन रक्कम रुपये ५,००,५६,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच ११ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला आधारभूत किंमत देण्याबाबत

(२५) * ३९५२४ श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, प्रा.डॉ.तानाजी सावंत, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाला किमान आधारभूत किंमत मिळत नसल्याने सन २०१८ साठीच्या खरीप कृषीमालाच्या किंमतीबाबत पश्चिम क्षेत्रिय राज्याच्या प्रतिनिधींची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य शासनाने केंद्रीय कृषी मुल्य आयोगाकडे केलेल्या शिफारशींपेक्षा १० टक्के वाढीव किंमत देण्यात यावी अशी मागणी मा.सहकार मंत्री महोदयांनी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिफारशींची अमंलबजावणी करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) ही बाब केंद्रीय कृषी मूल्य व किंमत आयोगाच्या अखत्यारीतील आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वाशिंद (पश्चिम) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील वहिवाटीचा रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्याबाबत

(२६) * ३९९१२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वाशिंद (पश्चिम) (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील साईनगर-मुरबाड रोड सर्व्हे नं. ७४/२ मध्ये कायदेशीर परवानगी घेवून इमारतीचे काम पूर्ण केले असताना, या इमारतीकरिता येण्या-जाण्याचा रस्ता बेकायदेशीर लोखंडी गेट लावून बंद केले असल्याबाबतची तक्रार स्थानिक रहिवाशांनी मा.महसूल मंत्री, अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल), जिल्हाधिकारी, ठाणे, उपविभागीय अधिकारी, भिंवडी व तहसिलदार, शहापूर यांचेकडे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी सर्व कागदपत्रांसह निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी रहिवाशांनी तक्रारी करुनही सदर रस्ता अद्याप वाहतुकीसाठी खुला केलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रहिवाशांच्या वहिवाटीतील असलेला रस्ता खुला करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२), (३) व (४) अशा आशयाची तक्रार श्री.रमाकांत कुशा सातपुते व इतर यांचे कुलमुखत्यार श्री.संतोष पितांबर कुरीयाली यांनी दिनांक ०४/०७/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे केली होती. त्यानुषंगाने सदर प्रकरणी मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ चे कलम ५ यातील तरतुदीनुसार तहसिलदार, शहापूर यांचेकडील क्र.मामलेदार कोर्ट/वहिवाट दावा क्र. ०१/२०१७, दिनांक २०/०४/२०१७ नुसार आदेश पारीत करण्यात आले आहेत. सदर आदेशाची अंमलबजावणी करण्याची संबंधितांची मागणी असून सदरील आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन घेण्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात समुद्राच्या उधाणामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

(२७) * ३९९६८ श्री.जयंत पाटील : सन्माननीय **खारभूमी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील कुर्डूस ते मानकुळे या खाडीकिनारपट्टीत गत ३२ वर्षात शासनाच्या खारभूमी विभागाने संरक्षक बंधारे बांधले नसून अस्तित्वात असलेल्या संरक्षक बंधाऱ्यांची देखभाल व दुरूस्तीअभावी दुरवस्था झाल्यामुळे समुद्राच्या उधाणाचे पाणी खाडीकिनारच्या ३६ गावांतील भातशेतीत घुसून सुमारे ३ हजार १६ हेक्टर भातशेत क्षेत्र जमीन नापीक होऊन सुमारे ५ हजार ८३५ शेतकऱ्यांचे ३२ वर्षात रुपये ४८३ कोटी ८९ लाख ६० हजारांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, खारभूमी योजना शासनाच्या ताब्यात गेल्यानंतर एकूण खारभूमी क्षेत्राच्या ५० टक्के भातशेती नापीक झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नापीक झालेल्या क्षेत्राचा सर्वेक्षण न झाल्यामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली नाही तसेच दुष्काळदेखील जाहीर होऊ शकला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिवाकर रावते : (१) हे अंशत: खरे आहे.

अलिबाग तालुक्यातील कुर्डुस ते मानकुले या पट्टयात एकूण १२ खारभूमी योजना असून या योजना सुमारे ६० वर्षापुर्वी बांधलेल्या आहेत. खारभूमी विकास योजनांचा बृहत आराखडा सन १९८१-१९८२ मध्ये मंजूर झाला. तेव्हा या योजना बृहत आराखडयात घेण्यात आल्या. त्यातील एक योजना खाजगी असल्याने बृहत आराखडयात समाविष्ट नाही.

सदर योजनांच्या नुतनीकरणासाठी व देखभाल व दुरूस्तीसाठी मागील २७ वर्षात फक्त रुपये १०.५४ कोटी इतकाच निधी प्राप्त झाला आहे. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी कोकणातील खारभूमी योजनांसाठी भरीव निधीची तरतूद करण्यात येईल.

यापैकी मेढेखार व देहेनकोनी या दोन योजना कांदळवनामुळे पूर्णपणे बाधित झाल्या आहेत. उर्वरीत १० योजनांपैकी मानकुळे व सोनकोठा हाशिवरे या दोन्ही योजनांच्या एकत्रित प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. २ योजना राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पात समाविष्ट आहेत. ३ योजनांच्या नुतनीकरणाची अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर प्रगतीपथावर आहे. २ योजनांची कामे विस्तार व सुधारणांतर्गत करण्यात आली आहेत. तसेच १ योजना खाजगी आहे. खाजगी योजना ताब्यात घेणेबाबतचा प्रस्तावाबाबत नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यानुसार CRZ मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

सन २०१४-२०१५ मध्ये अलिबाग तालुक्यातील ३६ गावामधील ५४७१ शेतकऱ्यांचे ३०१६.६२ हेक्टर क्षेत्राचे शेतीचे नुकसान झाल्याचे जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग व तालुका कृषी अधिकारी, अलिबाग यांचे अहवालावरुन दिसून येते.

(२) नाही.

सुमारे २५ वर्षांपासून देखभाल व दुरुस्तीसाठी पुरेशा निधी अभावी कांदळवनाची वाढ झाल्यामुळे अलिबाग तालुक्यातील पाच योजनांच्या एकूण ११८२ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे १०५० हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे.

(३) व (४) शासन परिपत्रकान्वये निर्धारित केलेल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये याचा समावेश नाही. त्यामुळे समुद्राच्या उधाणामुळे झालेल्या शेतीच्या नुकसान भरपाईची बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे आंबे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे पशुवैद्यकीय दवाखाना सुरु करण्याबाबत

(२८) * ४००६४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.श्रीकांत देशपांडे : सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आंबे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे पाळीव प्राणी व जनावरांची संख्या सुमारे ५००० इतकी असून गावात पशुवैद्यकीय दवाखाना नसल्याकारणामुळे सदर प्राण्यांच्या उपचारासाठी ग्रामस्थांना खाजगी डॉक्टरांवर अवलंबून रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी डॉक्टरांकडून प्राण्यांच्या उपचारार्थ येणारा खर्च ग्रामस्थांना न परवडणारा असून जनावरांच्या उपचारापोटी ग्रामस्थांची आर्थिक पिळवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावात पुशवैद्यकीय दवाखाना सुरु करण्याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आंबे येथे पशुवैद्यकीय दवाखाना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.महादेव जानकर : (१) हे खरे नसुन, मौजे आंबे, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे सन २०१२ च्या १९ व्या पशुगणनेनुसार एकूण २,६४१ पशुधन घटक संख्या आहे. मौजे आंबे येथुन ४.० कि.मी. अंतरावार चळे येथे श्रेणी-१ चा पशुवैद्यकीय दवाखाना कार्यरत असुन, सदर दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात आंबे गाव येत असल्यामुळे, या दवाखान्यामार्फत या गावातील पशुधनास पशुवैद्यकिय सेवा पुरविण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन आंबे गावातील एकूण पशुधन घटक संख्या २,६४१ असल्याने व आंबे गावालगतच्या ४.० कि.मी. अंतरावरील कार्यरत पशुवैदयकीय दवाखाना श्रेणी-१ चळे या संस्थेमार्फत आंबे गावास पशुवैद्यकीय सेवा मिळत आहे.

शासन निर्णय दिनांक १ जुलै, २०११ मध्ये नमुद निकषांनुसार मौजे आंबे, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे नविन पशुवैदयकिय दवाखाना स्थापन करण्यास वाव नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील नुकसानग्रस्त बागायतदार शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

(२९) * ४००८५ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे कासार्डे, नागसावंतवाडी (ता.कणकवली) येथील १८ एकर ऊस दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी, पावशी मिटक्याची वाडी (ता.कुडाळ) येथील २५० काजूची झाडे, कोकिसरे (ता.वैभववाडी) येथील

१४ एकर मधील ऊस दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी आगीत जळून खाक झाली असून तर प्रभानवली (ता.लांजा, जि.रत्नागिरी) गावातील ३०० काजूची झाडे आगीत जळून खाक होऊन शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जळीत बागांचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गाव मौजे कुडाळ तालुक्यातील मिटक्याची वाडी येथील श्रीमती सुषमा बापू भोगटे यांचे काजू बागेस आग लागून २५० काजू कलमे जळून ढोबळ रुपये १० लाख एवढे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच मौजे नारकरवाडी ता.वैभववाडी येथील श्रीमती सुभद्रा सावळाराम कोकाटे व अवधु शंकर नारकर यांच्या ऊस शेतीला वीज खांबावरील ताराचे घर्षण होऊन आग लागून रुपये ६ लाख २२ हजार इतके नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

मौजे प्रभानवली, ता.लांजा, जि.रत्नागिरी येथील श्री.अमोल मारोती रेडीज यांच्या गट क्र. २१२९ मधील ३०० काजू झाडे दिनांक १६/०१/२०१८ रोजी वनव्यामध्ये होरपळून मोहराचे नुकसान झाले आहे.

(२) शेतीतील पिकांना आग लागल्याची बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये येत नसल्याने सदर आगीत नुकसान झालेल्या आपद्ग्रस्तांना मदत अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आंबा नदीमधून होणारे अवैध वाळू उत्खनन रोखण्याबाबत

(३०) * ४०१२२ श्री.प्रविण दरेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील आंबा नदीमध्ये बेकायदेशीर सक्शन पंप लावून वाळू उत्खनन सुरु असून वाळू उपशामुळे बांधबंदीस्तीला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त वाळू उत्खनन बंद करण्याकरीता नवखार (ता.अलिबाग) हद्दीतील शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा शासनास इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२) व (३) आंबा नदीच्या किनारी (खाडीमध्ये) बेकायदेशीर सक्शन पंप लावून वाळू उत्खनन सुरु असून वाळू उपशामुळे बांधबंदीस्तीला धोका निर्माण झाल्याचे कुर्डूस, सिमादेवी, कुर्डूस सजा या खाडीलगतच्या शेतकऱ्यांनी दिनांक ६/१/२०१८ रोजी जिल्हाधिकारी, रायगड यांना निवेदन दिले होते व सदर निवेदनात त्यांनी सक्शन पंप बंद न झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यानुषंगाने सदर ठिकाणी होणारे रेतीचे अवैध उत्खनन रोखण्यासाठी तहसिलदार, अलिबाग यांनी दिनांक ११/१/२०१८ रोजी परिसराची तपासणी केली.

दिनांक १२/१/२०१८ ते १४/१/२०१८ या कालावधीत तपासणी पथकाने केलेल्या कार्यवाहीमध्ये अवैध वाळूची वाहतुक करतांना आढळलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन तसेच जप्त वाळूचा लिलाव करुन रुपये २,२५,०००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

दिनांक १६/१/२०१८ रोजी धरमतर खाडीजवळ वाळूसाठा करण्यात आलेल्या ६ कुंड्या नष्ट करण्यात आल्या आहेत. तसेच बेवारस स्थितीत आढळून आलेले ३ सक्शन पंप व ३ बोटी बंदर निरीक्षक, धरमतर यांचे कार्यालयाजवळील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या जेट्टीवर बांधून ठेवण्यात आल्या होत्या. तथापि, दिनांक १६/०१/२०१८ रोजी रात्रीच्या दरम्यान अज्ञात इसमाने

बांधून ठेवण्यात आलेल्या या बोटींचे दोर तोडल्यामुळे भरतीच्या वेळेत या बोटी व सक्शनपंप वाहून गेलेले आहेत. याबाबत दिनांक १७/१/२०१८ रोजी वडखळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धरमतर खाडी व आंबा नदी परिसरातील अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी तहसील कार्यालय, अलिबाग यांच्या अधिनस्त भरारी पथकाकडून वेळोवेळी पाहणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तांबवे फाटा-सुपने (ता.कराड, जि.सातारा) या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

(३१) * ४०१४१ श्री.आनंदराव पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांबवे फाटा-सुपने (ता.कराड, जि.सातारा) या ४ कि.मी. च्या रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे वारंवार अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) तांबवे फाटा ते सुपने हा ४.०० कि.मी. रस्ता राष्ट्रीय महामार्ग १६६ ई चा भाग असून जानेवारी, २०१८ मध्ये ह्या भागात एक अपघात झाला, हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय महामार्ग १६६ ई च्या हेळवाक ते कराड ह्या ४८ कि.मी. भागामध्ये पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरण (१० मी.) व सुधारणेचे बांधकाम प्रगतीत असून जुलै, २०१९ अखेर बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अमळनेर (जि.जळगांव) शहर बाहयवळण रस्त्याच्या मार्गाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(३२) * ४०१८७ श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर (जि.जळगांव) येथे मेहेरगांव-धुळे-अमळनेर-चोपडा-खरगोन रस्ता रा.मा.१५ वरील अमळनेर शहरानजीक बाहय वळण मार्गाची निर्मित होणेबाबत प्रस्ताव प्रलंबित असल्याचे निदर्शनात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाहय वळण मार्गाकारीता आवश्यक भूसंपादनासाठी निधी उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बाहय वळण मार्ग निर्मितीकरीता निधी उपलब्ध देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) होय.

(२) हे खरे नाही.

सदर वळण रस्त्याच्या भुसंपादनासाठी रुपये १,३४,२५,५२६.००/- एवढा निधी उपलब्ध असुन सदर निधी कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अमळनेर यांनी पत्र क्र.साबांवि/अ लेखा/अमळनेर/६३४८ दिनांक २३/११/२०१२ अन्वये विशेष भूसंपादन अधिकारी, जळगाव यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

(३) सदर मूळ प्रस्ताव उपविभागीय अधिकारी अमळनेर तथा विशेष भूसंपादन अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.भूसंपादन/कावि/१३७२ दिनांक २४/१२/२०१४ अन्वये व्यपगत झाल्याचे कळविले आहे व सदर प्रस्ताव नवीन कायद्यानुसार (भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ चे नियम १८(१) प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे वटार (ता.वसई, जि.पालघर) येथील जमिनीवर कुळांच्या वारसांची नोंद घेण्याबाबत

(३३) * ४०६१९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वटार (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं. १२७ हिस्सा नं. ३ या जमिनीबाबत कोणतेही आदेश नसताना तसेच फेरफार मंजूर झालेला नसताना जमिनीवरील कुळांच्या नावाला कंस (वगळून) करुन, कुळाचे नांव कमी करण्यात आल्याचे दिनांक १६ जून, २०१६ रोजी जा.क्र.वटार/१४७/२०१६ या अहवालाद्वारे संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी तहसिलदार, वसई यांचे निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कुळांचे नांव कायम करुन त्यांचे वारसांची नांवे ७/१२ सदरी दाखल करण्याकामी आदेश व्हावा असेही सदर अहवालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बेकायदेशीरपणे कंस करुन कमी केलेल्या संबंधित कुळांची नांवे कायम करुन त्यांच्या वारसांची नांवे ७/१२ सदरी दाखल करण्यास तहसिलदार, वसई हेतूपुरस्सरपणे दुर्लक्ष करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२), (३) व (४) नाना काळया दमेल या मयत कुळाच्या नावे कुळ म्हणून मौ.वटार ता.वसई या गावातील एकूण १४ सर्व्हे क्रमांकातील जमिनींची सन १९६० सालच्या अतिरिक्त शेत जमीन न्यायाधिकरणाच्या आदेशान्वये विक्री करण्यात आली होती. त्यानुषंगाने अधिकार अभिलेखात नोंदविण्यात आलेल्या फेरफार क्रमांक २९२७, दिनांक १३/०६/१९६२ अन्वये या १४ सर्व्हे क्रमांकातील जमिनीपैकी फक्त ७ सर्व्हे क्रमांकाच्या जमिनींना या खरेदीची नोंद करण्यात आली असून, कलम ३२ग

च्या आदेशात नमूद सर्व जमिनींना कुळाच्या खरेदीची नोंद करण्यात यावी, अशी विनंती दिनांक २७/०६/२०१३ च्या अर्जान्वये या मयत कुळाच्या वारसांनी अप्पर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, वसई यांना केली. सदर अर्जाची मंडळ अधिकारी, आगाशी यांनी चौकशी करुन दिनांक २३/०९/२०१३ रोजी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दिनांक २६/१२/२०१४ च्या पत्रान्वये तहसिलदार, वसई यांनी तलाठी वटार यांना ज्या ७ सर्व्हे क्रमांकातील जमिनीबाबत, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम ३२ग नुसार खरेदीची नोंद करण्यात आलेली नाही, अशा जमिनींच्या अधिकार अभिलेखात कुळाच्या खरेदीची नोंद घेण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुषंगाने तलाठी, वटार यांनी अधिकार अभिलेखामध्ये फेरफार क्रमांक ४९९० अन्वये नोंद घेतली व सदर नोंद दिनांक ०७/०७/२०१५ रोजी मंजूर करण्यात आली. या मंजूर फेरफार नोंदीचा अंमल सदर नोंदीतील जुना सर्व्हे क्र. २४८/३ (१२७/३ नवीन) वगळता उर्वरित जमिनींच्या गाव नमूना नंबर ७/१२ सदरी घेण्यात आल्या.

जुना सर्व्हे क्रमांक २४८/३ (१२७/३ नवीन) च्या गावनमूना नंबर ७/१२ च्या इतर अधिकारामध्ये कुळाच्या नावाची नोंद नसल्याने या सर्वे क्रमांकाच्या गावनमूना नंबर ७/१२ सदरी फेरफार क्रमांक ४९९० प्रमाणे तलाठी वटार यांनी नोंद घेतली नाही व ही बाब दिनांक १६/०६/२०१६ च्या अहवालाद्वारे तहसिलदार, वसई यांना अवगत केली. तहसिलदार, वसई यांनी दिनांक ०२/०२/२०१८ च्या पत्रान्वये तलाठी, वटार यांना जुना सर्व्हे क्रमांक २४८/३ ची विक्री सन १९६० साली झाली असल्याने त्यानुषंगाने नोंद घेण्याबाबत कळविले. तलाठी, वटार यांनी मंजूर फेरफार क्रमांक ४९९० नुसार जुना सर्व्हे क्र.२४८/३ (१२७/३ नवीन) या जमिनीच्या गावनमूना नंबर ७/१२ च्या कब्जेदार सदरी मयत कुळाच्या वारसांच्या नावांची नोंद केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील कृषी अधिकारी व कृषी सहायक पदे भरण्याबाबत

(३४) * ४०६२५ प्रा.डॉ.तानाजी सावंत : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा (जि.यवतमाळ) तालुक्यात "कृषी अधिकारी" व "कृषी सहायक" ही पदे गत ३ वर्षापासून रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे आत्महत्याग्रस्त यवतमाळ जिल्ह्यातील कृषी अधिकारी कार्यालयामार्फत शेतकऱ्यांना आवश्यक असलेले मार्गदर्शन, शासकीय योजना यांची माहिती मिळत नसल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१) हे अंशत: खरे आहे.

तालुका कृषी अधिकारी, पांढरकवडा जि.यवतमाळ अंतर्गत माहे जानेवारी, २०१८ अखेर तालुका कृषी अधिकारी १ पद, कृषी अधिकारी संवर्गातील ३ पदे, कृषी पर्यवेक्षक व कृषी सहाय्यकांचे प्रत्येकी १ पद रिक्त आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त पदभार नजिकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन व योजनांची माहिती देण्यात येत आहे.

महाराष्ट्र कृषी सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गातील ७९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले असून लोकसेवा आयोगाकडून दिनांक १२/०४/२०१७ रोजी जाहिरात विज्ञापित करण्यात आलेली आहे.

कृषी सहाय्यक या संवर्गातील ७३० कृषी सेवकांची निवड यादी सर्व विभागीय कृषी सहसंचालक यांना पाठविण्यात आलेली असून त्याबाबत प्रचलीत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. कृषी सहाय्यकांची रिक्त असलेली उर्वरित ९०५ पदे भरण्यासाठी जाहिरात विज्ञापित केलेली आहे.

एप्रिल/मे, २०१८ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक बदल्यांच्या वेळी पांढरकवडा तालुक्यातील रिक्त पदे प्राधान्याने भरण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यात मृद व जलसंधारणाच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(३५) * ३८५०७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील कृषी विभागाने सन २०१४ ते २०१७ या कालावधीत विकासाच्या नावाखाली मृद व जलसंधारणाच्या ५ हजार ८८१ कामांवर रूपये १४९ कोटी खर्च केल्याचे दाखवून रूपये १०० कोटींचा गैरव्यवहार केल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराप्रकरणी संबंधित जबाबदार ९४ अधिकारी व कर्मचारी यांना नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी बंद करण्याबाबत कृषी विभागास आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१), (२) व (३) सन २०१४-१५ व २०१५-१६ या कालावधीतील कृषी आयुक्तालयातील दक्षता पथकाने मृद व जलसंधारणाच्या केलेल्या कामांच्या तपासणी अहवालात रुपये ९.४४ लाख इतक्या रकमेची कामे आक्षेपार्ह आढळून आली आहेत. दक्षता पथकाच्या या निष्कर्षाच्या अनुषंगाने आयुक्त (कृषि) यांनी संबंधित ९५ अधिकारी/कर्मचारी यांना दिनांक २७/४/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत. सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या तीन वर्षांमध्ये झालेल्या मृद व जलसंधारण कामांची नव्याने चौकशी करण्याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर कामांची तपासणी दक्षता पथकामार्फत करण्यात येत आहे. सदर कामांची चौकशी बंद करण्याबाबत शासनाकडून कोणतेही आदेश दिलेले नाहीत.

(४) प्रस्तुत प्रकरणी श्री.जे.पी.शिंदे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, सातारा यांना दिनांक २०/१२/२०१७ च्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. दक्षता पथकाचा तपासणी अहवाल व त्यावर जलसंधारण खात्याचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यात तलाठी व मंडळ अधिकारी यांनी विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्रे देणे बंद केल्याबाबत

(३६) * ३७८५५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य तलाठी संघ यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या निवेदनानुसार प्रधान सचिव, महसूल यांना राज्यभरात विविध स्वरूपाचे दाखले आणि महसूल प्रमाणपत्रे देण्याचे काम बंद करत असल्याचे लेखी कळविले असून दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ पासून राज्यात विशेषतः बीड जिल्ह्यात तलाठी आणि मंडळ अधिकारी यांनी ३६ प्रकारचे दाखले व प्रमाणपत्र देण्याचे काम बंद केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी संघाच्या प्रमाणपत्र व दाखले देण्याचे काम बंद केल्याने शेतकरी, शेतमजूर, निराधार, अपंग, विद्यार्थी आणि रुग्ण यांच्यासह इतरांना दैनंदिन गरजेचे महसूली प्रमाणपत्र मिळत नसल्याने अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल नियम १९६६ प्रमाणे तलाठी आणि मंडळ अधिकारी यांना कोणकोणते दाखले देण्याचे अधिकार आहेत, नियमातील अधिकाराप्रमाणे तलाठी आणि मंडळ अधिकारी यांच्याकडून सदरचे दाखले देण्याचे काम होत आहे काय, राज्यात महसूली दाखले व प्रमाणपत्रे नियमित देण्यासाठी शासनाने नियमावली केली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात तलाठी संघाच्या काम बंद आंदोलन प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) याबाबत महाराष्ट्र राज्य तलाठी संघाकडून शासनाकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने राज्यात काही भागात तलाठ्यांनी त्यांच्या स्तरावरून देत असलेले दाखले देणे बंद केले ही वस्तुस्थिती आहे.

बीड जिल्ह्यातील आष्टी, परळी व अंबाजोगाई तालुक्यातील सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांच्याकडून विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्र दिले जात आहेत. परंतु बीड, पाटोदा, गेवराई, वडवणी, केज, माजलगांव, धारुर, शिरुर तालुक्यात अर्जदारांकडून स्वयंघोषणापत्र घेऊन दाखले देण्यात येत आहेत.

(३) व (४) तलाठी/मंडळ अधिकारी यांना अधिकार अभिलेख संबंधी कागदपत्रे व नकला देण्याचे अधिकार आहेत व ते देण्याचे काम तलाठी/मंडळ अधिकारी यांचेकडून करण्यात येत आहे.

ई-डिस्ट्रीक्ट प्रकल्पांतर्गत नागरिकांना देण्यात येणारे विविध दाखले व प्रमाणपत्रे यांचे प्रमाणीकरण करणे व दाखले देण्याच्या पध्दतीत सुसूत्रता आणण्याच्यादृष्टीने दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ व दिनांक ३१ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तलाठी यांनी

द्यावयाचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र देण्याच्या पध्दतीत अधिक सुसूत्रता आणण्यासाठी शासन परिपत्रक दिनांक १८ ऑक्टोंबर २०१७ अन्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

तसेच उपरोक्त दिनांक २१ फेब्रुवारी, २०११ व दिनांक ३१ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयामध्ये काही शब्द प्रयोगांमुळे प्रशासकीय स्तरावर कोणत्याही स्वरुपाची संदिग्धता राहू नये यादृष्टीने दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सुधारित आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईच्या एम.ई.पी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल नाक्यांचे कंत्राट रद्द करण्याबाबत

(३७) * ३९३०५ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९६९ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या एम.ई.पी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल नाक्यांचे कंत्राट रद्द करण्याबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदारावर अद्याप कोणतीही कारवाई शासनामार्फत करण्यात आली नसल्याची तक्रार विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

(२) अशी तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) मुंबई प्रवेशद्वार व मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर हलक्या वाहनांना सूट देण्याबाबत आर्थिक सुसाध्यता तपासण्यासाठी अप्पर मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली असून त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावरील निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ढेबेवाडी विभागातील (ता.पाटण, जि.सातारा) वांग नदी पात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(३८) * ३९४६२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ढेबेवाडी विभागातील (ता.पाटण, जि.सातारा) वांग नदी पात्रात रात्रीच्या वेळी बेसुमार वाळू उपसा होत असल्याने पाटण तालुक्याचे प्रांताधिकाऱ्यांनी तेथील वाळू माफियांवर कारवाई करून ट्रॅक्टर व काही सामुग्री जप्त केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाळू माफियांवर कारवाई होऊनही वाळू माफिया राजकीय नेत्यांच्या संगनमताने नदी पात्रातील वेगवेगळ्या ठिकाणी अवैधरित्या वाळू उपसा करत असल्याचे स्थानिक ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर व त्यांना सहकार्य करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२) व (३) दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी ढेबेवाडी विभागातील मौजे कुठरे (टेकळेवाडी) ता.पाटण येथील वांग नदीपात्रात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या प्रकरणी २ वाहने जप्त केली असून दिनांक ४ जानेवारी, २०१८ रोजी मौजे मोळावडेवाडी (मोरेवाडी) येथे ४० ब्रास मातीमिश्रीत वाळूचा व २७ ब्रास वाळूचा अनधिकृतपणे केलेला वाळूचा साठा आढळून आला. वाळूच्या अवैध साठ्याबद्दल रुपये २१,१३,८५०/- इतक्या रक्कमेच्या दंडाचे आदेश महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ च्या कलम ४८(७) प्रमाणे तसेच वाळूच्या अवैध वाहतुकीसाठी वापरलेल्या दोन वाहनांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४८(८) अन्वये रुपये २.०० लाख इतक्या रक्कमेच्या दंडाचे आदेश तहसिलदार, पाटण यांनी दिनांक ९/२/२०१८ रोजी पारीत केले आहेत.

मौजे मोरेवाडी (कुठरे) येथील नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा होत असल्याबाबत ग्रामपंचायत मोरेवाडी यांच्या दिनांक ०५/०१/२०१८ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने मंडळ अधिकारी, कुठरे यांनी ग्रामपंचायत सदस्यांसह दिनांक २/२/२०१८ रोजी केलेल्या स्थळपाहणीमध्ये त्याठिकाणी वाळूचे उत्खनन होत नसल्याचे दिसून आले असून तसे सरपंच, ग्रामपंचायत मोरेवाडी यांना अवगत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे राजावली (ता.वसई, जि.पालघर) येथील विकासकांकडून स्वामित्वधन वसूल करण्याबाबत

(३९) * ४००७२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजावली (ता.वसई, जि.पालघर) येथील स.नं. ५८/२, ५९/१, स.नं. ६०, ७५/१ व इतर अशी सुमारे ४५९, १६५ एकर जमिनीत मे.सहारा ग्रुप ॲण्ड कंपनीज व इतर या विकासकांने बेकादेशीर भराव व अनधिकृत सिमेंट-काँक्रीटीचे रस्ते बनविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात वसई तहसिलदार कार्यालयाकडून स्वामित्वधन संबंधित तक्रारीवर जारी केलेल्या दिनांक १९ जानेवारी, २०१७ रोजीच्या नोटीसांवर सुमारे रुपये ४०,६५,७०,३१५/- चे शासनाचे स्वामित्वधनही विकासकाने कोषागारात जमा केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर स्वामित्वधन विकासकांकडून वसूल करुन विकासकांना काळ्या यादीत टाकण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) मौजे राजावली, ता.वसई येथील स.नं. ५८/२, ५९/१, ६० व ७५/१ व इतर या खाजगी जमिनीमध्ये विकासकाने अंतर्गत रस्ते बनविले आहेत.

(२) तहसिलदार, वसई यांनी दिनांक १९/१/२०१७ रोजी संबंधित विकासकास खडीच्या अनधिकृत वापराबाबत रुपये २,३५,६०,९३७/- इतकी रक्कम, मातीच्या अनधिकृत उत्खनन व वापरापोटी रुपये ३१,१२,२९,६००/- इतकी रक्कम तसेच दगडाच्या अनधिकृत वापराबाबत रुपये ५५,०६,५९०/- इतकी रक्कम आणि रेतीच्या अनधिकृत वापराबाबत रुपये ६,६२,७३,१८८/- इतकी रक्कम दंड म्हणून का आकारण्यात येऊ नये, अशा नोटीसा दिल्या आहेत.

(३) संबंधित विकासकाने नोटीसींच्या अनुषंगाने दिलेले खुलासे विचारात घेऊन तहसिलदार, वसई यांनी खडी व दगडाच्या अनधिकृत वापराबाबत दिलेल्या नोटीसीतील दंड कायम करण्याचे आदेश दिनांक २९/११/२०१७ रोजी पारित केलेले आहेत.

वाळू व मातीच्या अनधिकृत उत्खनन व वापराच्या बाबत दिलेल्या नोटीसीच्या अनुषंगाने संबंधित विकासकाने दिलेल्या खुलाशाची पडताळणी करण्याचे काम तहसिलदार, वसई यांचेस्तरावर सुरु आहे.

सक्तीच्या उपाययोजना अवलंबून खडी व दगडाच्या अनधिकृत वापराबद्दल करण्यात आलेल्या दंडाच्या रकमा वसूल करण्याची कार्यवाही तहसिलदार, वसई यांचेस्तरावरुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ येथील राज्य परिवहन महामंडळाच्या बस दुरूस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(४०) * ३९२३३ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस दुरुस्तीसाठी लागणाऱ्या खर्चामध्ये तफावत असून यात गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बस दुरुस्तीसाठी दाखविल्या गेलेल्या खर्चाची चौकशी होऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी प्रादेशिक सचिव कामगार सेना यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिवाकर रावते : (१) व (२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वडगाव पिंगळा (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे मेगा फूड पार्क उभारण्याबाबत

(४१) * ३७९६१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव पिंगळा (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथे प्रस्तावित असलेले मेगा फूड पार्कचे काम सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१) होय.
(२) मेगा फूड पार्क उभारण्यास मान्यता देणे ही बाब केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीतील आहे. त्याकरीता केंद्र शासनास संबंधित संस्था/कंपनी यांनी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. सदरची बाब मा.लोकप्रतिनिधींना कळविण्यात आली आहे.
(३) लागू नाही.

औरंगाबाद प्रादेशिक परिवहन विभागातून जुनी वैधता नोंद असलेले अनुज्ञप्ती वितरीत केल्याबाबत

(४२) * ३८७५२ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद प्रादेशिक परिवहन विभागाचा गैर कारभारामुळे परवाना संपलेले कार्डच नागरिकांना पाठविण्यात आल्याचा प्रकारामुळे नागरिक त्रस्त झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार या प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिवाकर रावते : (१) होय.
(२) स्मार्ट कार्ड अनुज्ञप्तीकरिता राष्ट्रीय सुचना केंद्र यांच्यामार्फत सारथी ४.० प्रणाली विकसित केली आहे. दिनांक ५/१२/२०१७ रोजी सारथी प्रणालीमधील

तांत्रिक दोषामुळे जुनी वैधता नोंद असलेल्या अनुज्ञप्ती छपाई झाल्या व त्या नागरिकांना देण्यात आल्या होत्या. सदर बाब लक्षात येताच तात्काळ राष्ट्रीय सुचना केंद्र यांच्याशी संपर्क साधून सदर त्रुटीचे निरसन करण्यात आले आहे. त्यानंतर संबंधितांना सुधारीत स्मार्टकार्ड अनुज्ञप्ती देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-गोवा महामार्गावर ट्रामा केअर व अद्यावत प्राथमिक उपचार केंद्रांची उभारणी करण्याबाबत

(४३) * ४०३२८ श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक १९६५४ ला दिनांक २२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्ते अपघात रोखण्यासाठी विविध उपयोजना राबविण्यात येत असल्या तरी रत्नागिरी जिल्ह्यातून जाणारा मुंबई-गोवा महामार्गावरील अपघाताचे प्रमाण वाढले असून दररोज सरासरी दोन अपघात होत आहेत, सन २०१७ मध्ये वर्षभरात ७८८ रस्ते अपघातात १४० जणांना आपले प्राण गमवावे लागले असून १२४० जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई-गोवा महामार्गावर ट्रामा केअर व अद्यावत प्राथमिक उपचार केंद्रांची उभारणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) हे खरे असल्याचे अप्पर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य यांनी कळविले आहे.

(२) मुंबई-गोवा महामार्गावर वडखळ, नागोठणे, महाड व संगमेश्वर या ४ ठिकाणी ट्रामा केअर सेंटर आणि ३५ ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र/ ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहेत. तसेच इंदापूर ते झाराप ह्या ३६६ कि.मी.

महामार्गाच्या चौपदरीकरणाचे बांधकाम १० पॅकेजमध्ये हाती घेतले असून कशेडी घाटातील बोगदा वगळून उर्वरीत ३५३ कि.मी. महामार्गाचे चौपदरीकरण टप्प्याटप्प्यात डिसेंबर,२०१९ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे चाविंद्रे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

(४४) * ३७८६८ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चाविंद्रे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्व्हे नंबर ११९ व १२० मधील १२३ गुंठे शासकीय गुरचरण जमिनीवर अतिक्रमण करून इमारतींचे बांधकाम करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी वाणिज्य वापर करून किराणा व भाड्याची घरे देण्यात येऊन पैशांची वसुली करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२), (३) व (४) मौजे चाविंद्रे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं. ११९ (क्षेत्र ०-४३.० हे-आर) आणि स.नं. १२० (क्षेत्र ०-३०.० हे-आर) या सरकारी गुरचरण जमिनी असून उक्त मिळकतींसंदर्भातील फेरफार क्रमांक २८७, दिनांक २०/१०/१९६० पाहता सदर मिळकती काही शर्तींवर ग्रुप ग्रामपंचायत, चाविंद्रे यांच्या ताब्यात देण्यात आल्याचे दिसून येते. सद्यस्थितीत मौजे चाविंद्रे हे गाव भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट आहे.

सदर गुरचरण जमिनीवर काही लोकांनी झोपड्या व घरे बांधून अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आले असून सदर अतिक्रमणे निष्कासित करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ५० मधील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तहसिलदार, भिवंडी यांना दिले आहेत.

पैनगंगा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील नदीपात्रातून अवैध रेती उत्खनन रोखण्याबाबत

(४५) * ३८५४१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रातील एकाही रेती घाटाचा लिलाव झाला नसतांना तलाठी व मंडळाधिकारी यांच्या दुर्लक्षामुळे सिंदखेड तांडा, धानोरा (सी), रामपूर, खंबाळा, पाथरी येथून दरदिवशी १५० च्या वर ट्रॅक्टरद्वारे विनापरवाना अनधिकृतरित्या रेतीची वाहतुक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, रेतीच्या अनधिकृत वाहतुकीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अवैध रेती वाहतुकीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून पैनगंगा नदीपात्रातून होणारी अवैधी रेती वाहतुक रोखण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रातील एकाही रेतीघाटाचा लिलाव झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, सदर ठिकाणाहून दरदिवशी १५० च्या वर ट्रॅक्टरद्वारे विनापरवाना अनधिकृतरित्या रेतीची वाहतूक केली जात असल्याचे किंवा रेतीच्या अनधिकृत वाहतूकीकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) वाळूच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. किनवट तालुक्यातील भरारी पथकाने जानेवारी, २०१८ मध्ये किनवट (जि.नांदेड) या तालुक्यात वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या तीन वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ५७,२००/- इतकी रक्कम वसूल केली आहे. माहे जानेवारी,२०१८ या कालावधीमध्ये किनवट तालुक्यात वाळूच्या अवैध प्रकरणात ३२ वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ६,५५,२००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

हरभरा बियाणे वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

(४६) * ४०४४१ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ३७४४९ ला दिनांक २६ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरभरा या वाणाकरीता शासनाने अनुदान जाहिर केले असून त्या अनुदानानुसार महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ व कृभको या कंपन्यांचे हजारो क्विंटल बियाणे जिल्ह्यातील कृषी सेवा केंद्रावर केलेले हरभरा बियाणे कंपनी व कृषी विभागाशी संगनमत करुन बाजारात विकून करोडो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंपनी व संबंधित कृषी केंद्रावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१) नाही.

हरभरा पिकाच्या अनुदानीत वाणाचे बियाणे बाजारात विकून बियाणे कंपन्या व कृषी विभागाच्या संगनमताने गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले हे खरे नाही. तथापि, अकोला जिल्ह्यातील ४ कृषी सेवा केंद्रांनी उगवा गावातील १४६ शेतकऱ्यांच्या नावाने जिल्ह्यास पुरविलेल्या अनुदानित बियांण्यापैकी ७०५ बॅगांची परस्पर उचल करुन खुल्या बाजारात धान्य म्हणून विक्री केली असल्याचे कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचे चौकशीमध्ये निदर्शनास आले आहे.

(२) महाबीजचे अधिकृत विक्रेते मे.दिपक कृषी केंद्र, अकोला यांच्या बियाणे वितरणामध्ये काही संशयास्पद बाबी लक्षात आल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही करुन त्यांचे महाबीज अधिकृत विक्रेतेपद रद्द करण्यात आले आहे. सदर प्रकरणी बियाण्यांची खुल्या बाजारात धान्य म्हणून विक्री करुन महाबीज व शासनाची फसवणूक केलेल्या बियाणे विक्रेत्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबत महाबीजला निर्देश दिले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यात ओखी चक्रीवादळामुळे नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

(४७) * ३९५०९ डॉ.अपूर्व हिरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अरबी समुद्रात दिनांक ४ ते ६ डिसेंबर, २०१७ या कालावधीत झालेल्या ओखी चक्रीवादळामुळे नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यातील १४२ गावांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे १२३१:२२ हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष व शेतमाल इ. पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा प्रशासनास प्राप्त प्राथमिक अहवालावरून निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओखी वादळामुळे जिल्ह्यात एकूण १२५.५ मि.मी. इतक्या पावसाची नोंद होवून पाऊस, वादळ, ढगाळ वातावरण, सलग ३ दिवस सुर्यदर्शन न होणे, कडाक्याची थंडी यामुळे द्राक्ष बागांचे तसेच, शेती पिकांचे नुकसान झाले असून नाशिक, दिंडोरी, निफाड, सटाणा आणि चांदवड या पाच तालुक्यात सर्वाधिक हानी झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यात अवकाळी पाऊस, वादळ, गारपीटीमुळे झालेल्या पीक नुकसानीचे पंचनामे होऊनही जिल्ह्यातील सव्वा लाख शेतकऱ्यांना अद्यापही शासनाकडून नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नाशिक जिल्ह्यात अवकाळी पाऊस व ओखी वादळामुळे नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) राज्यात अरबी समुद्रात दिनांक ४ ते ६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास झालेल्या ओखी चक्रीवादळामुळे व त्यामुळे झालेल्या अवकाळी पावसामुळे नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यातील १७० गावांतील १५०६ शेतकऱ्यांचे १२९५.०३ हेक्टर वरील फळपीक व शेतीपिकांचे ३३% च्या वर नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले. नाशिक जिल्ह्यात दिनांक ४ व ५ डिसेंबर, २०१७ रोजी ओखी चक्रीवादळामुळे अनुक्रमे ३४.०९ मि.मी. व १७१.३ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

(३) व (४) राज्यात दिनांक ४ ते ६ डिसेंबर, २०१७ या कालावधीत ओखी चक्रीवादळामुळे व त्यामुळे आलेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिके / फळपिके यांचे झालेल्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन सविस्तर प्रस्ताव पाठविण्याबाबतच्या सूचना सर्व क्षेत्रिय कार्यालयांना शासनपत्र दिनांक ७ डिसेंबर, २०१७ अन्वये देण्यात आल्या आहेत. सदर माहिती संकलित करण्याचे काम सुरु असून या संदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागोठणे ते दहेज (भिवंडी) पाईपलाईन टाकण्याचे कामांकरीता संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत

(४८) * ४०४८९ श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिलायन्स गॅस कंपनीकडून नागोठणे ते दहेज (भिवंडी) असे पाईपलाईन टाकण्याचे कामकाज सुरु असून त्यासाठी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेकडो एकर जमिनी शासनाने परस्पर संपादित करुन ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कांमध्ये रिलायन्स कंपनीच्या नावाची नोंद करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संपादित केलेल्या जमिनीचा योग्य मोबदला मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून जमिनीचा योग्य मोबदला न दिल्यास ग्रामस्थांनी संपूर्ण कुटुंबियासह आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) हे अंशत: खरे आहे.

रिलायन्स गॅस ट्रान्सपोर्टेशन ईन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (RGTIL) या कंपनीने सन-२००७ मध्ये जमिनींच्या वापराचे हक्काचे संपादन पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम,१९६२ चे कलम ६(१) नुसार अहमदाबाद ते काकीनाडा गॅस पाईपलाईन (पूर्व-पश्चिम पाईपलाईन EWPL) या प्रकल्पासाठी पालघर, ठाणे व रायगड जिल्ह्यातील गावांमधून पाईपलाईन टाकण्यासाठी जमिनीच्या वापराच्या हक्काचे संपादन केले आहे. त्याप्रमाणे सदर प्रकल्पासाठी संपादित केलेल्या क्षेत्राची नोंद संबंधित जमिनीच्या ७/१२ च्या इतर हक्कात मे.रिलायन्स गॅस ट्रान्सपोर्टेशन ईन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड गॅस पाईपलाईनकरिता क्षेत्रामधील वापराचे हक्क संपादन असा उल्लेख करुन नोंदी घेण्यात आल्या आहेत.

तद्नंतर, RGTIL कंपनीने सन-२०१५ मध्ये जमिनींच्या वापराचे हक्काचे संपादन पेट्रोलियम आणि मिनरल्स पाईपलाईन (जमिनीच्या वापराच्या हक्काच्या संपादनाचा) अधिनियम,१९६२ चे कलम ६(४) नुसार सदर जमिनीच्या वापराचे हक्क रिलायन्स गॅस पाईपलाईन लिमिटेड या कंपनीला दहेज-नागोठणे ईथेन पाईपालाईन प्रकल्पाची पाईपलाईन टाकणे व अन्य कामासाठी दिले आहे. सदर कंपनीने अद्यापपर्यंत संपादित केलेल्या क्षेत्राची नोंद संबंधित जमिनीच्या ७/१२ चे इतर हक्कात घेण्यात आलेली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

बाधित जमिनीच्या नुकसान भरपाईबाबत युवा भूमीपुत्र सामाजिक संघटना यांनी दिनांक ०८/०२/२०१८ रोजीच्या निवेदनाद्वारे पोलीस महासंचालक, मुंबई यांना संबंधित शेतकरी, सामाजिक संघटना, महिला मंडळ, ग्रामस्थ आत्महत्या सारखा पर्याय निवडतील असे कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील सीमा तपासणी नाक्याचे आधुनिकिकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

(४९) * ४०२०८ श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सीमेवरील तपासणी नाक्याचे आधुनिकिकरण करण्याचा निर्णय सन २००८ मध्ये होऊनही परिवहन विभागाच्या २४ पैकी फक्त १६ नाक्याचे आधुनिकिकरण करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सीमा तपासणी नाक्याचे आधुनिकिकरणाचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून सदर कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिवाकर रावते : (१) होय.

महाराष्ट्र राज्यातील परिवहन विभागाच्या एकूण २४ तपासणी नाक्यांचे आधुनिकिकरण व संगणकीकरणाचा निर्णय घेण्यात आला.

(२) व (३) एकूण २४ सीमा तपासणी नाक्यांपैकी १६ तपासणी नाक्यांचे विकसन पूर्ण होऊन ते कार्यान्वित झाले आहेत. तर २ तपासणी नाक्यांचे विकसनाचे काम पूर्ण झाले असून ते कार्यान्वयाखाली आहे.

मा.न्यायालयाचे मनाई हुकूम व भूसंपादनातील अडचणी यामुळे उर्वरित ६ तपासणी नाक्यांचे बाबतीत विकसनात अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे उर्वरित तपासणी नाक्यांच्या आधुनिकिकरणास विलंब झाला आहे. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

गेवराई (जि.बीड) तालुक्यातील सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी यांनी गैरव्यवहार केल्याबाबत

(५०) * **३९७४ श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०१७ मध्ये गेवराई तालुक्यातील सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी यांनी शासनाला बनावट व बोगस बिले तयार करून गैरव्यवहार केल्याबाबत ॲड.इंदर नागरे, रा.संगमजळगाव, ता.गेवराई यांनी केलेल्या तक्रारीवरून जिल्हाधिकारी, बीड यांनी उपविभागीय अधिकारी, गेवराई यांना दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी चौकशी करण्याचे निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, गेवराई यांनी याबाबतचा अहवाल दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना सादर केला असून सदर अहवालात तत्कालीन तहसिलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी देयक क्र. ३१८, दिनांक २२ मार्च, २०१७ नुसार वाहनाच्या इंधनासाठी रुपये २,२५,००० बेकायदेशीररीतीने उचल केले असून आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्यांना वा कर्मचारी यांना विश्वासात न घेता बोगस १७ वाहने अधिग्रहित केल्याचे भासवून लाखो रुपयांची शासन फसवणूक केल्याचे नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीड जिल्ह्यात कोणकोणत्या तालुक्यात अशाप्रकारे गैरव्यवहार झाला आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) श्री.इंदर नागरे, रा.संगमजळगाव ता.गेवराई, जि.बीड यांनी मा.राज्य निवडणूक आयोगाकडे केलेल्या तक्रारीची शहनिशा करण्याबाबत मा.राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ०२/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना कळविले होते. तद्नुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर तक्रारीची चौकशी करण्याकरिता उपविभागीय अधिकारी, बीड यांना निर्देशित केले होते. त्यानुसार उपविभागीय अधिकारी बीड, यांनी केलेल्या चौकशीमध्ये सकृतदर्शनी काही अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) गेवराई तालुक्यातच अशा प्रकारचा गैरव्यवहार झालेला दिसून येत आहे.
(४) सदर प्रकरणी सकृतदर्शनी निदर्शनास आलेल्या अनियमिततांच्या अनुषंगाने संबधितांविरुद्ध विभागीय चौकशी सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना दिनांक २३/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे अंतर्गत विविध कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

(५१) * ३९३२२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे अंतर्गत विविध कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांना सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे ठाणे अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागात अनियमितता झाल्याची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचे आदेश व लोकप्रतिनिधींच्या तक्रारीच्या अनुषंगाने याबाबतच्या चौकशी अहवालात कोणत्या बाबी निदर्शनास आल्या व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२), (३) व (४) सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे अंतर्गत कामांच्या अनुषंगाने विभागात प्राप्त विविध तक्रारीवरील अहवाल मागविण्यात आलेले आहेत.

अहवाल प्राप्त झाल्यांनतर त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील भूसंपादन झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला देण्याबाबत

(५२) * ४०३४७ श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळशिरस (जि.सोलापूर) तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ सातारा-लातूर या रस्त्याचे काम सुरु करतांना शेतकऱ्यांना विश्वासात घेतले नसून त्यांना योग्य मोबदलाही दिला नसल्यामुळे सदर शेतकऱ्यांनी योग्य मोबदला दिल्याशिवाय काम सुरु करु न देण्याचा निर्णय शेतकरी संघर्ष समितीने घेतला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) व (२) शेतकऱ्यांना योग्य मोबदला दिल्याशिवाय काम सुरु न करु देण्याचा निर्णय शेतकरी समितीने घेतला आहे हे खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८ सी च्या म्हसवड ते टेंभुर्णी ५७.६८ कि.मी. लांबीमध्ये भौमितिक सुधारणा व पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरणाच्या (१० मी. रुंदीसाठी) बांधकाम प्रकल्पाचे बांधकाम हाती घेतले आहे.

रस्त्याची सुमारे २४ ते ३० मी. रुंदीपर्यंत जागा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात असल्याने महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय क्र. संकिर्ण-०५/२०१०/प्र.क्र.१११/अ-२ दिनांक २६/१०/२०१० नुसार त्या जमिनीचा मोबदला देण्याची आवश्यकता नाही ही बाब विचारात घेऊन फक्त भौमितीक सुधारणा (वळण सुधारणा, पुनर्आखणी), बस बे, विश्रांती थांबा इ. बांधकामांसाठी अस्तित्वातील रस्त्याच्या हद्दीबाहेरील जागेची आवश्यकता असून अशा हे. १४.२७२ अतिरिक्त जागेसाठी वाटाघाटीने भूसंपादन करण्यासाठी कार्यवाही प्रगतीत आहे.

तथापि शेतकऱ्यांनी अस्तित्वातील जागेचा मोबदला मिळाला नसल्याने काम करण्यास विरोध केला असल्याने उपविभागीय अधिकारी, माळशिरस यांनी शेतकरी व म.रा.र.वि.म. यांचे अधिकारी व संबंधित कंत्राटदार यांचे समवेत ०६/०२/२०१८ रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत अस्तित्वातील रस्त्याच्या हद्दीबाबतची मोजणी करुन रस्त्याच्या हद्दीचे नकाशे तयार करण्याचे ठरले. तसेच जेथे रस्त्याचे रुंदीकरण शेतकऱ्यांच्या जमिनीत होणार आहे अशी ठिकाणे निश्चित झाल्यानंतर भुसंपादनाबाबतची पुढील कार्यवाही करता येईल. सद्यस्थितीत रस्त्याच्या हद्दीचे मोजणी नकाशे तयार करण्याचे काम प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

येवला (जि.नाशिक) विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांसाठी केंद्रीय मार्ग निधीमधून अनुदान मिळणेबाबत

(५३) * ३९२४३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांसाठी केंद्रीय मार्ग निधीमधून अनुदान मिळणेसाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नाशिक यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाकडे प्रस्ताव प्राप्त झाला आहे काय, उक्त प्रस्तावानुसार येवला विधानसभा क्षेत्रातील रस्त्यांसाठी केंद्रीय मार्ग निधीमधून अनुदान मिळणेसाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१) होय.

(२) केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत ४ कामांचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झाला असून त्यावर कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील नुकसानग्रस्त कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

(५४) * ३८५४३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापसाचे उत्पादन केले असता कापसाला एकही बोंड आले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोहा तालुक्यातील देऊळगांव मालवाचे शेतकरी अशोक बाबाराव सोवनवळे यांनी त्याच्या दोन एकर दहा गुंठे शेतीमध्ये विठ्ठल बीटी, राजा बिटी अ-१५५ जातीच्या वाणाचा कापूस लावुनही या कापसाला एकही बोंड आले नसल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.पांडुरंग फुंडकर : (१) हे खरे नाही.

(२) श्री.अशोक बाबाराव सोवनवळे, रा.देऊळगाव, ता.लोहा, जि.नांदेड यांनी ३६ गुंठे इतक्या क्षेत्रावर राजा बी.टी. आणि विठ्ठल बी.टी. या कापुस वाणांची पेरणी केलेली होती. सदर क्षेत्राची तपासणी केली असता पिकावर शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळुन आलेले होते.

(३) प्राप्त तक्रार अर्जाची दखल घेऊन नुकसानग्रस्त क्षेत्राचे सर्वेक्षण करण्यात आलेले असून यासंदर्भात नुकसान भरपाई देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्ह्यात बोंडअळी प्रादुर्भावामुळे बाधित कापुस उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

(५५) * ३९५१० डॉ.अपूर्व हिरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात बोंड अळीच्या आक्रमणामुळे मालेगांव, नांदगाव, येवला, सटाणा, सिन्नर, निफाड, चांदवड व देवळा या आठ तालुक्यातील ४८ हजार ४७३ : ५१ हेक्टर क्षेत्रावरील कापसाचे नुकसान झाल्याचे जिल्हा

प्रशासनास प्राप्त अंतिम अहवालावरून दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील ७१ हजार ९८१ कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे संपूर्ण क्षेत्र बाधित झाले असून ३३ हजार १०५ हेक्टर जिरायत क्षेत्रावरील तर २८४१.७८ हेक्टर बागायत क्षेत्रावरील कापुस पिकाचे नुकसान झालेले आहे, तर अन्यत्र ठिकाणी किडीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी कापसाचे पिकच उखडून नष्ट केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिरायती आणि बागायती क्षेत्रावरील ३३ टक्क्यांपेक्षा जास्त क्षेत्राच्या नुकसानग्रस्तांच्या मदतीसाठी जिल्हा प्रशासनाने रुपये २६ कोटी ३३ लाख, ४५ हजार ७८६ रुपयांच्या मदत निधी मागणीचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जिरायती व बागायती क्षेत्रीकरीता मागणीचा मदत निधी प्रस्तावास मान्यता देवून निधी वितरीत करण्याबाबत तसेच, बोंड अळीच्या प्रादुर्भावामुळे नुकसानग्रस्त कापुस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.चंद्रकांत पाटील : (१), (२) व (३) हे अंशत: खरे आहे.

नाशिक जिल्ह्यात ३५९४७.५७ हेक्टर क्षेत्रावरील कापुस पिकाचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार २६३३.४५७८६ इतक्या निधीची मागणी जिल्हाधिकारी, नाशिक यांनी केलेली आहे.

(४) खरीप हंगाम २०१७ मध्ये कापुस पिकावरील बोंडअळीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई केंद्र शासनाच्या निकषाप्रमाणे देण्यासंदर्भात दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री क्षेत्र आळंदी ते कुडपण (ता.पोलादपूर) अशी नवीन बससेवा सुरु करण्याबाबत

(५६) * ४०६२८ श्री.प्रविण दरेकर : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र आळंदी ते कुडपण (ता.पोलादपूर) अशी नवीन बस सेवा राज्य परिवहन महामंडळाने सुरु करणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक ६ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन सदर बस सेवा सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिवाकर रावते : (१) सदर बससेवा सुरु करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री (परिवहन) व मा.राज्यमंत्री (परिवहन) यांना निवेदन दिलेले आहे.

(२) सदर मागणीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाद्वारे उन्हाळी गर्दीच्या हंगामात सदर बससेवा सुरु करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.